# लोकअदालत

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कामठी यांचे न्यायालयात**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 551/2026**

१ गुन्हा घडल्याची तारीख - 27/02/2026

२ फिर्याद दिल्याची तारीख - 27/02/2026

३ फिर्यादीचे नाव - महाराष्ट्र राज्य सरकार तर्फे PL संजय 16010

पोलीस स्टेशन जुनी कामठी

४ आरोपीचे नाव, वय व पत्ता - मो. अफजाल मो. इस्माईल

वय 26 वर्षे, व्यवसाय –

राह. कोळसा टाल कामठी

५ गुन्हयांचा तपशील -

तुम्ही वर नमूद आरोपीने दि. 27/2/26 रोजी 12/30 वाजताचे सुमारास येथे तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन हे रहदारीस अडथळा होईल अशारितीने उभी करुन रस्त्यावरील अथव सार्वजनिक नौकानयन मार्गावरील कोणत्याही व्यक्तीला धोका, अटकाव किंवा इजा करील असे ठेवलेले मिळून आले व त्याद्वारे तुम्ही भारतील न्याय संहिताचे कलम २८५ अन्वये गुन्हा केला असल्याचे तोहमत आहे.

तारीखः 14/03/2026

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कामठी.

**आरोपीचे निवेदनः**

प्रश्न क्र.१. तुम्हाला फिर्यादीची नक्कल मिळाली का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.२. तुम्हाला आत्ता वाचुन दाखविलेला आरोप समजला का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

उत्तर – होय

आरोपीची सही

तारीखः 14/3/2026

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कामठी.

## न्यायनिर्णय

आरोपीला दोषारोपपत्रा सोबत हजर केले. आरोपीने, इच्छापूर्वक गुन्हा कबुल केला व शिक्षेवेळी कमीत–कमी शिक्षा करणेची मागणी केली. आरोपीने इच्छापूर्वक गुन्हा कबुल केल्याने मी त्याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये दोषी ठरवून पुढीलप्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

१. आरोपीला याद्वारे भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये गुन्हा केल्याचे आरोपात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ नुसार दोषी ठरवुन त्यास **रुपये २००/– (अक्षरी दोनशे रुपये फक्त )** दंडाची शिक्षा करणेत येते. तसेच दंडाची रक्कम न भरल्यास १ दिवस साध्या कारावासाची शिक्षा करणेत येते.

२. प्रकरण येणे प्रमाणे निकाली काढण्यात येते.

तारीखः 14/03/2026

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कामठी.

R-No-502/26
PS-2001-depo
Hed
14/03/26